# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक २७.०६.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २६.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १९ केसेसमध्ये २२ ईसमांवर कारवाई करून ६९,३७५/—रू. चा मुद्‌देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ५ केसेसमध्ये २७ इसमांवर कारवाई करुन १०,०९,९००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,६७८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,४०,६५९/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यावसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतून मानवी तस्करी व व्यवसायीक लैंगिक शोषणाची जाळी उखडून टाकण्याच्या उद्देशाने नागपूर शहरात सुरू असलेल्या **''ऑपरेशन शक्ती अंतर्गत''** दिनांक २६. ०६.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, फ्लॅट क्र. १७, एनआयटी कॉम्प्लेक्स, ब्लॉक ए येथे सार्वजनिक ठिकाणी सापळा रचुन, रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी महिला क्र. १) शालिनी उर्फ वर्षा चंद्रशेखर वंजारी वय ३५ वर्षे रा. दुर्गा नगर, संदीप कांबळे यांचे घरामागे, भरतवाडा, कळमणा, नागपूर २) अर्चना शेखर वैशंपायन वय ४३ वर्ष रा. फ्लॅट क्र. १७, एनआयटी कॉम्प्लेक्स, ब्लॉक ए, नंदनवन, नागपूर हया स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता पिडीत महीलांकडुन देहव्यावसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आल्या. आरोपी महिलांचे ताब्यातुन ०२ पिडीत महीलांची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख १,५००/—रू., ०२ मोबाईल फोन व इतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे १८,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे कलम १४३(२),१४३(३) भा.न्या.सं., सहकलम ३, ४, ५, ७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी नागपूर शहर चे मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. अभिजीत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील व त्यांचे पथकाने केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे जुनी कामठी :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी भारती रमेश नागपूरे वय ३८ वर्ष रा. प्लॉट क्र. १७, भोयर ले आऊट, येरखेडा, ता. कामठी जि. नागपूर यांची लहाण बहिण नामे सौ. मंजु संदीप पचारे वय २७ वर्ष हिचे लग्न सन २०२३ मध्ये संदीप रामुजी पचारे वय २९ वर्ष रा. पाचखेड ता. बाभुळगाव जि. यवतमाळ याचेसोबत झाले होते. मंजु हिचा पती आरोपी हा दारुचा व्यसनी असल्याने तिला नेहमी मानसिक व शारीरीक त्रास देत असे. या त्रासाला कंटाळून मंजु ही तिचे नवऱ्याला सोडून आपले वडीलांकडे कामठी नागपूर येथे मागील दीड वर्षापासून राहत होती. आरोपी पती हा सतत कामठी येथे येवून मंजुला नांदायला चल म्हणून आग्रह करीत असे. परंतु अमरावती कोर्ट येथे त्यांचे फारकतीचे प्रकरण सुरु असल्याने, मंजु ही नांदायला जायला तयार नव्हती. दिनांक २४.०६.२०२६ रोजी वरुड अमरावती येथील कोर्ट येथे आरोपीला आहेरात दिलेली सोन्याची अंगठी परत न करण्याचे बदल्यात आंदणातील सामान परत देवुन फारकत देण्यास तो तयार झाला होता. परंतु तेव्हा त्याची पत्नी मंजु हीला पाहून घेण्याची धमकी दिली होती. दिनांक २६.०६.२०२६ चे १८.१५ वा. ते १८.३० वा. चे दरम्यान, फिर्यादीची बहिण मंजु हिला भेटण्यासाठी तीचा पती आरोपी हा कामठी येथील हरीष सिरीया यांचे घरचे बाजुचे गलीमध्ये दरोगा मस्जिदजवळ आला असता, त्याने फारकतीचे कारणाचा राग मनात धरुन त्याची पत्नी मंजु हिला कोणत्यातरी धारदार शस्त्राने छातीवर, गळयावर, मानेवर, पाठीवर तसेच, हाता—पायावर वार करुन जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि. मिलींद मेश्राम ७८८८०८४००० यांनी आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे लकडगंज :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २७.०६.२०२६ चे ०३.४५ वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गंगा जमुना वस्ती, लता मौंदेकरचे घरामागे, सार्वजनिक ठिकाणी, अंगात फिक्कट आकाशी रंगाचा फुलशर्ट व निळया रंगाची जिन्सपॅन्ट घातलेला इसम शस्त्र घेऊन फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन परिसरात शोध घेत असता, प्राप्त वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळताना दिसुन आला. त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव निखिल उर्फ दद्‌या प्रकाश मेश्राम वय ३२ वर्षे रा. हिवरी नगर, प्रशांत शाळेजवळ, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. त्यास परीसरात फिरणेबाबत अधिक विचारपुस केली असता, त्याने उडवा—उडवीची उत्तरे दिली. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी धारदार चाकू किंमती २००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन वावरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. प्रशांत सरकटे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे जरीपटका :— दुकान फोडणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी यश सिध्दार्थ गजभिये वय ३० वर्षे रा. प्लॉट क्र. ९४, आराधना कॉलनी, नारा रोड, जरीपटका, नागपूर यांचे पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत कडबी चौक, सदोदय अपार्टमेंट येथे शॉप क्र. १०८ मध्ये जुने व नवीन मोबाईल विक्रीचे दुकान आहे. दिनांक २५.०६.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २६.०६. २०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी हे त्यांचे मोबाईल शॉपला कुलूप लावून बंद करून आपले घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटरचे कुलूप तोडुन व शटर उचकवून, दुकानात प्रवेश करुन, दुकानात ठेवलेले वेगवेगळया कंपनीचे जुने व नवीन असे एकूण ३३ मोबाईल फोन किंमती अंदाजे ७,००,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. दशरथ पवार ८३९०४१४५२० यांनी अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल गुन्हा नोंदविला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु) बेवारस**

**पोलीस ठाणे यशोधरानगर :—** दिनांक २६.०६.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, गुरु गोविंदसिंग मैदान, भारत पेट्रोल पंप समोर, एकता कॉलनी ते ऑटोमोटीव्ह चौककडे जाणारे रोडचे फुटपाथवर हातठेल्याचे बाजुला एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—अंगात निळसर रंगाचे हाफबाहीचे टिशर्ट व पांढरे रंगाचा हॉफपॅन्ट बरमुडा तसेच, दोन्ही पायात पांढरे बुट व काळे मोजे घातलेले आहेत. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे यशोधरानगर येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी निखिल आनंद माने वय २० वर्ष रा. आवास योजना, बिल्डींग क्र. पी—१,ए १, फ्लॅट क्र. ००४, संघर्षनगर, यशोधरानगर, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि. सदाशिव कणसे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

**वाहतुक शाखा पोलीसांनी मानले जनतेचे आभार**

दिनांक २५ व २६.०६.२०२६ रोजी असलेल्या मोहर्रम सणानिमीत्ताने संपुर्ण नागपुर शहरातुन मुस्लीम बांधवांनी ताजीया, सवारी काढल्या होत्या. नमुद ताजीया, सवारी ह्या १) ईमामवाडा करबला, २) ताजनगर टेका करबला, ३) ताजबाग करबला, ४) भोले शाह बाबा दरगाह, ५) कन्हान नदी साई मंदिर मागे, ६) गाडेघाट, कन्हान नदी अशा ०६ ठिकाणी करबला संपन्न झाल्या.

मोहर्रम सणादरम्यान संपुर्ण नागपुर शहरातील महत्वाचे रस्ते व चौकांमध्ये वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, वाहतूकीची कोंडी होवु नये, या दृष्टीने वाहतूक विभागातर्फे वाहतूक पोलीस बंदोबस्तात १७ अधिकारी व २२६ पोलीस अंमलदार लावण्यात आले होते.

वाहतूक बंदोबस्ताचे योग्य नियोजन केल्यामुळे सामान्य नागरीकांना वाहतूक कोंडीचा नाहक त्रास सहन करावा लागला नाही तसेच, वाहतूक सुरळीत चालु राहीली. यादरम्यान नागरीकांनी केलेल्या सहकार्या बद्यल वाहतुक पोलीसांनी जनतेचे आभार मानुन, असेच भविष्यातही सहकार्य राहील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

स्वा/–
**(आदित्य मिरखेलकर, भापोसे.)**
पोलीस उप आयुक्त वाहतुक,
नागपुर शहर.